# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/07/2023 (सोमवार) सकाळ


## सराईत गुन्हेगार खैलेश पंचम सलामे व शुभम उर्फ निखील पंचम सलामे यांना MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता स्थानबध्द आदेश

### (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत येणाऱ्या शिवाजी नगर कन्हान ता. पारशिवनी जिल्हा नागपूर परीसरात राहणारे सराईत गुन्हेगार **खैलेश पंचम सलामे, वय ३३ वर्ष व शुभम उर्फ निखील पंचम सलामे, वय ३० वर्ष, दोन्ही रा. शिवाजी नगर कन्हान ता. पारशिवनी जिल्हा नागपूर** हे सख्खे भाऊ असुन ते मागील काही वर्षापासून कन्हान गावामध्ये जवळील आसपासचे भागामध्ये व परिसरात गुंडगिरी करुन तेथील नागरिकांना त्रास देत होते. ते नेहमी गुन्हेगारी कृत्यात गुंतलेले असायचे त्यांनी पोलीस स्टेशन कन्हान परिसरात **साथीदांरासह दुखापत पोहचवुन जिवे मारण्याची धमकी देणे, घातक शस्त्रासह दरोडा घालुन गंभीर दुखापत करणे, साथीदारासह गंभीर स्वरूपाची दुखापत पोहचविणे, गैर कायद्याची मंडळी जमवुन प्राणघातक शस्त्राने जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, अवैध प्राणघातक शस्त्रे बाळगणे, घातक हत्याराने गंभीर जखमी करून लुटपाट करणे, गंभीर दुखापत करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, गैर कायद्याची मंडळी जमवुन पोलीसांना ते करत असलेल्या कामात अडथळा निर्माण करणे, अवैध प्राणघातक हत्यार/अग्निशस्त्र बाळगणे, साथीदांरासह जबरी चोरी करून दुखापत करणे, जुगार खेळणे, गैरकायद्याची मंडळी जमवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणे तसेच महीलांची छेड काढणे** यासारखे गुन्हे करण्याच्या सवयीचे आहेत. त्यांच्या असामाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये ते आपले स्वत:ची भीती निर्माण करुन दहशत पसरवित होते. नागपूर ग्रामीण पोलीसांना त्यांचेविरुध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवून त्या दोघांचेही विरूद्ध गुन्हे नोंद करून त्यांना अटक करुन कारागृहात पाठविले आहे. परंतु खैलेश पंचम सलामे, वय ३३ वर्ष व शुभम उर्फ निखील पंचम सलामे, वय ३० वर्ष यांचे गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा झालेली नाही. त्यामुळे त्यांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्यांचेविरूद्ध प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु त्यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरुच ठेवली. त्यांचे कृत्य सामाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण कडुन MPDA कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दि. २९/०७/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी खैलेश पंचम सलामे, वय ३३ वर्ष रा. शिवाजी नगर कन्हान ता. पारशिवनी जिल्हा नागपूर यांचे विरुध्द स्थानबध्दता आदेश काढला असुन त्यानुसार त्यांना मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे १ वर्षाकरीता स्थानबध्द केले आहे. परंतु त्याचा भाऊ शुभम उर्फ निखील पंचम सलामे, वय ३० वर्ष, रा. शिवाजी नगर कन्हान ता. पारशिवनी जिल्हा नागपूर याला स्थानबद्धतेच्या आदेशा बद्दल शंका आल्याने तो कन्हान परीसरातुन फरार झाला. त्याचा पोलीसांनी शोध घेतला असता तो आजपर्यंत मिळुन आला नाही. त्याचा कन्हान पोलीस शोध घेत आहे. याच दोघा भावाने काही दिवसापुर्वी कन्हान च्या रस्त्यावर तलवार घेवुन दुकान लुटले होते. याबाबत त्याचा व्हिडीओ प्रसारीत झाल्यानंतर त्याला अटक केले होते.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान श्री. पुंडलिक भटकर यांचे मार्गदर्शनात श्री. मकेश्वर,

ठाणेदार पो.स्टे. कन्हान स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक चव्हान, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, सहायक फौजदार सुरज परमार, पोलीस हवालदार निलेश बर्वे, मुदस्सर जमाल, पोलीस अंमलदार होमेश्वर वाईलकर यांनी पार पाडली.

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत २० कि. मी अंतरावरील मौजा पिंडकापार शिवार येथे दिनांक २९/०७/२०२३ चे १९.०० वा. ते १९.२० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– सौ. कविता संजय ईनवाते, वय ३३ वर्ष रा. पिंडकापार ता. रामटेक ही दि. २९/०७/२०२३ चे रात्री ०७/०० वा. दरम्यान घरी स्वयंपाक करीत होती त्यावेळी तिचा मोठा भाऊ **मृतक नामे– नरेश जयसिंग वरठी, वय ३० वर्ष, रा. पिंडकापार ता. रामटेक** हा दारू पिवून घरी आला व घरी येवून स्वत:च बडबड करत होता. फिर्यादीचे पती नामे – १) संजय श्रीराम ईनवाते, वय ४० वर्ष, रा. पिंडकापार ता. रामटेक व लहान भाऊ नामे– २) महेश जयसिंग वरठी, वय २७ वर्ष रा. पिंडकापार हे घरी नसल्याने फिर्यादी ही जेवण करण्याकरीता बोलवण्यासाठी गावामध्ये गेली व सोबतच गावातून घराकडे तिचे पती व लहान भाऊ परत आले. तेव्हा तिचा मोठा भाऊ नरेश हा घरी मोठमोठयाने शिवीगाळ करून घरातील सामान फेकफाक करीत होता व म्हणत होता की तुम्ही माझे घरी राहायचे नाही तुम्ही जर माझे घरी राहीले तर मी तुम्हाला कापून टाकीन नाहीतर घरामध्ये जाळून टाकीन असे म्हणून शिवीगाळ करीत होता तो फिर्यादीचे अंगावर आला. म्हणून फिर्यादीचे पती संजय ईनवाते व लहान भाऊ महेश वरठी हे चिडून संजयने हातात विळा खुरपी व लहान भाऊ महेश वरठी याने हातात लाकडी काठी घेवून नरेश वरठी याचे डोक्यावर जिव घेण्याचे उद्देशाने मारून गंभीर जखमी केले त्यामुळे नरेश हा तिथेच खाली पडला व त्याचे डोक्यातून रक्त निघत होते. कोणीतरी पोलीसांना फोन केल्याने थोडयाच वेळात पोलीस तेथे आले. व लोकांच्या मदतीने नरेश वरठी याला उपचारकामी ग्रामीण रूग्णालय देवलापार येथे आणले तेव्हा तेथील डॉक्टरांनी नरेश याला तपासून मरण पावल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०२, ३४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शरद गायकवाड पो.स्टे. देवलापार मो. नं. ९९२३९८८२९२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**